# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

**विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे - ४११०३७.**

**शालेय प्रसार परीक्षा विभाग**

दूरध्वनी:०२०-२४४०३०४३,२४४०३०९०, फॅक्स:०२०-२४२६६०६८,२४२७१६९५, ई.मेल-shaleyaprasar@yahoo.com वेबसाईट: www.tmv.edu.in

**डॉ. उमेश केसकर** — कुलसचिव/कार्यवाह

**डॉ. दीपक टिळक** — कुलगुरु/उपाध्यक्ष


दि. २१ नोव्हेंबर २०१३

प्रति,

मा. मुख्याध्यापक

सप्रेम नमस्कार,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गेली ६० वर्षे शालेय विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवत आहे शालेय अभ्यासक्रमास अनुलक्षून घेण्यात येणा-या विविध विषयांच्या परीक्षा हया त्यापैकीच एक उपक्रम होय. विद्यार्थ्यांना अवघड वाटणा-या विषयांचा पाया अधिक पक्का व्हावा, त्यांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन व्हावे व त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी या उद्देशाने या परीक्षांची आखणी करण्यात आलेली आहे. त्यामुळेच या परीक्षा शाळा व विद्यार्थी वर्गामध्ये मान्यता पावल्या आहेत. या परीक्षांना आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे याचा आम्हाला अतिशय अभिमान आहे.

या परीक्षांच्या संदर्भात काही महत्वाची माहिती या माहितीपुस्तिकेत खालीलप्रमाणे उपलब्ध आहे. या सर्व माहितीची नोंद घ्यावी व आपला प्रतिसाद वृद्धिंगत करावा ही विनंती. **नाशिक व निगडी विभागीय कार्यालयाचा पत्ता बदलला आहे. तरी कृपया संबंधित परिसरातील शाळांनी नवीन पत्यावर संपर्क साधावा. सत्र सप्टेंबर २०१३ पासून विद्यार्थीसंख्येनुसार मुख्याध्यापकांना/केंद्रसंचालकांना मानधन देण्यात येत आहे.**


१. शुल्काबाबत - पान क्र. १० ते १२

२. हिंदी व जपानी भाषांच्या परीक्षा नव्याने सुरू करणेबाबत - पान क्र. ४ व १८

३. वार्षिक परीक्षा कार्यक्रम व वक्तृत्व स्पर्धेचा कार्यक्रम - पान क्र. २

४. आकर्षक पारितोषिके - पान क्र. ९

५. जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसविणा-या शाळांचा गौरव - पान क्र. १९

६. गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी व प्रथम क्रमांकास मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचा गौरव- पान क्र. २० व पुढे


तरी कृपया या बदलांची नोंद घेऊन विविध विषयांच्या परीक्षांसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करावी ही विनंती.

कळावे.

**डॉ. उमेश केसकर**
**कार्यवाह**

## मुख्याध्यापक/केंद्रप्रमुखांना मानधन

विद्यापीठाच्या विविध उपक्रमासाठी नेहमीच प्रोत्साहन देणा-या तसेच शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठीच्या परीक्षा गांभीर्याने, जबाबदारीने व पारदर्शी पद्धतीने घेतल्या जाण्यासाठी शाळेमधील/केंद्रांमधील मुख्याध्यापक/केंद्रप्रमुख हे प्रयत्नशील असतात. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना सप्टेंबर २०१३ सत्रातील परीक्षांपासून विविध विषयांच्या सर्व परीक्षेसाठी नोंदणी करणा-या विद्यार्थी संख्येनुसार केंद्रप्रमुखांना/मुख्याध्यापकांना खालीलप्रमाणे मानधन देण्यात येणार आहे.(पान क्र. १२ - शुल्कातील कॉलम २ मध्ये देण्यात येणा-या मानधनाव्यतिरीक्त) सदर मानधन निकालासोबत देण्यात येत आहे.

| विद्यार्थी संख्या | देण्यात येणारे मानधन रु. |
|---|---|
| १५१ ते ३०० पर्यंत | ३००/- |
| ३०१ ते ४०० पर्यंत | ४००/- |
| ४०१ ते ५०० पर्यंत | ५००/- |
| ५०१ पेक्षा अधिक | ७५०/- |

# वार्षिक कार्यक्रम २०१४

| फेब्रुवारी सत्र | सप्टेंबर सत्र |
|---|---|
| शुल्कासह यादी स्वीकारणे – दि. २६ डिसेंबर २०१३ पर्यंत | शुल्कासह यादी स्वीकारणे –दि. २५ जुलै २०१४ पर्यंत |
| विलंब शुल्कासह – दि. ३१ डिसेंबर २०१३ | विलंब शुल्कासह – दि. २ ऑगस्ट २०१४ |
| परीक्षा दिनांक – फेब्रुवारी महिन्यातील सर्व रविवार | परीक्षा दिनांक – सप्टेंबर महिन्यातील सर्व रविवार |
| निकाल दिनांक– जून महिन्यातील दुसरा आठवडा | निकाल दिनांक– नोव्हेंबर महिन्यातील शेवटचा आठवडा |

## फेब्रुवारी २०१४ सत्रातील परीक्षा कार्यक्रम

| **वार व दिनांक** | **विषय** (वेळ – स. १० ते १) | **विषय** (वेळ – दु. २ ते ५) |
|---|---|---|
| रविवार दि. ०२ फेब्रुवारी २०१४ | मराठी | मराठी पाठांतर, मराठी लेखन कौशल्य<br>नृत्यकला (लेखी परीक्षा – मध्यमा, पदविका) |
| रविवार दि. ०८ फेब्रुवारी २०१४ | संस्कृत | विज्ञान |
| रविवार दि. १६ फेब्रुवारी २०१४ | इंग्रजी | इंग्रजी संभाषण, इंग्रजी लेखन कौशल्य |
| रविवार दि. २३ फेब्रुवारी २०१४ | गणित | हिंदी (२ तास)<br>SLCIT ( 30 min.), FFCE ( 90 min.) |

**नृत्यकला प्रात्यक्षिक परीक्षेचा कार्यक्रम परीक्षेस नाव नोंदणी करणा–या केंद्रांना नंतर कळविण्यात येईल.**

## वक्तृत्व स्पर्धा (मराठी, इंग्रजी व हिंदी)

| | | |
|---|---|---|
| नाव नोंदणी तारीख | – | सोमवार, दि. ७ जुलै २०१४ पर्यंत, |
| स्पर्धा दिनांक | – | गुरुवार, दि. १० जुलै २०१४ |
| स्पर्धा ठिकाण | – | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे ३७ |
| पारितोषिक वितरण | – | रविवार, दि.१३ जुलै २०१४<br>तिथीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी |
| पारितोषिक वितरण ठिकाण | – | लो. टिळक पुतळा, महात्मा फुले मंडई, पुणे<br>हस्ते – पुणे महानगरपालिकेचे महापौर |

पिंपरी–चिंचवड, सांगली व रत्नागिरी विभागीय कार्यालयांतर्गतही वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येते. अधिक माहितीसाठी इच्छुक शाळांनी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा.

**सूचना :** शालेय प्रसार परीक्षा विभागाच्या परीक्षा व वक्तृ त्व स्पर्धेच्या कार्यक्रमामध्ये परिस्थितीनुसार आवश्यकतेनुसार बदल केले जातील.
अधिक माहितीसाठी विद्यापीठामध्ये संपर्क साधावा.

आपल्या शंका, सूचना, तक्रारी यांचे जलद निवारण करण्यासाठी खालील संबंधित व्यक्तिंशी संपर्क साधावा.


• **विभागप्रमुख –** राजीव देशपांडे – ९८२३०४५७७९ • **इंग्रजी –**सारिका तांबे– ९९७५१९२७६५ • **इंग्रजी, जपानी** – योगेश सराफ – ९६६५५१०००७
• **गणित, हिन्दी –** कैलास लबडे– ९५२७८९८९६२, • **SLCIT, FFCE, गणित** – सुचिता भुजबळ – ९९२१६९१९४९,
• **मराठी, संस्कृत, विज्ञान, नृत्यकला, मराठी लेखन कौशल्य, मराठी पाठांतर–** पौर्णिमा कुलकर्णी – ९७६५६०४५१८,
• **शुल्काबाबत –**सुषमा खुडे – ९०११९११६७७, • **आवक–जावक–** पुरुषोत्तम कुलकर्णी – ९७६५४६०७३९,

| मा. डॉ. उमेश केसकर | मा. सरिता साठे | मा. डॉ. दीपक ज. टिळक |
|---|---|---|
| कार्यवाह / कुलसचिव | अध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ | उपाध्यक्ष / कुलगुरू |

## शाखा

**मुंबई कार्यालय** – मुख्याध्यापक भवन, ४ था मजला, प्लॉट नं. ६बी, सायन (प), मुंबई ४०००२२, दूरध्वनी (०२२) ४०९०४०८, मोबाईल ९९२०१३५२३७

**नवी मुंबई कार्यालय** – ग्रेट इस्टर्न चेंबर्स, प्लॉट नं २८,से.नं. ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४, दूरध्वनी (०२२)२७५७२९९५,

**सांगली कार्यालय** – टि.म.वि. सांगली कॅम्पस, वसंतदादा इंडस्ट्रियल इस्टेट, केसरी कार्यालयाजवळ,सांगली–४१६४१६, फॅक्स २३१०८४६ दूरध्वनी (०२३३)२३११९२०, मोबाईल ९०२८८००६२८

**सोलापूर कार्यालय**– सर्व्हे नं १३२/३अ, प्लॉट नं. १० व १२, आसरा रेल्वे पुलाजवळ, डी–मार्ट शेजारी, नरसिंह नगर, पाण्याच्या टाकीसमोर, सोलापूर ४१३००४, दूरध्वनी (०२१७)२३०११९९, मोबाईल ९९२२१३२१९९

**चिपळूण कार्यालय** – डी २/१/२, एम.आय.डी.सी. ऑफीस जवळ, एस.बी.आय.बँक समोर, खेरडी, चिपळूण, रत्नागिरी ४१५६०५, मोबाईल ९६७३४९९८०१

## विभागीय कार्यालय

### नाशिक
मा. गौरी जोशी
सुगम संस्कृतम् रिसर्च अॅड करिअर डेव्हलपमेंट सेंटर
११ बालाजी पॅलेस, वडाळा पाथर्डी रोड, इंदिरानगर,
नाशिक ४२२००९, दूरध्वनी ०२५३–२३७०३५९,
मोबाईल ९८८१०७५९२५, ९८९०४४५९२५,
E-mail - sugam@sanskritam.net

### जळगाव
मा. योगेश लाठी
आय.जी.एम. कॉम्प्युटर एज्युकेशन, लाठी प्लाझा, शाहू मार्केट समोर,
गणेश कॉलनी रोड, जळगाव– ४२५००१,
दूरध्वनी (०२५७)२२४१८५१, मोबाईल ९८२२४६४९३१
E-mail - igmjalgaon@rediffmail.com

### मुंबई
मा. भूषण पिंपळे
श्री. सिद्धीविनायक इंन्फोटेक, ००६ देवराज मॉल,
मधुराम हॉलसमोर, स्टेशन जवळ, दहिसर (पू), मुंबई ४०००६८,
दूरध्वनी (०२२)२८२८४०३६, मोबाईल ९३२४६८०८८१
E-mail - bhushanpimple@yahoo.co.in

### रायगड (खोपोली)
मा. सुचिता गुरव
मंगलमुर्ती बिल्डींग, पाटणकरवाडी, के. एन. सी. कॉलेज समोर,
मु.पो. खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड
मोबाईल ९८८१६५६९४९
E-mail - suchitagurav306@gmail.com

### रत्नागिरी
मा. मेधा देवस्थळी
गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी ४१५६१२,
मोबा. ९४२३२९१९२६,

### डोंबिवली
मा. विजयकुमार मांढरे
एम.जी.आय.टी., ब/०२, गोल्डन पार्क को. ऑप. हौ.सोसा., आर. जी. पाटीलवाडी, नांदिवली क्रॉस रोड नं.२, डोंबिवली(पू), ठाणे ४२१२०१,
दूरध्वनी ०२५१–२४२५३८६, मोबाईल ९८२१९१९६७०
E-mail - vsmandhare@rediffmail.com

### नागपूर
मा. सुनील पाटील
सिद्धेश्वर शिक्षण संस्था ३४९/२, कस्तुरबा भवन, बजाज नगर,
नागपूर ४४००१०, दूरध्वनी(०७१२) २२२१२५८
मोबाईल ९४२२१४९६६८
E-mail - gyansandesh@yahoo.com

### औरंगाबाद
मा. मथुरादास देशमुख
आविष्कार बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, प्लॉट नं. २, देवगिरी स्नेह अपार्टमेंट, रोशन हाउसिंग सोसायटी, गारखेडा परिसर, औरंगाबाद
दूरध्वनी ०२४०–६९९४०१६ मोबाईल ९९६०२९०००७,
E-mail - mr.mvd53@rediffmail.com

### अहमदनगर
मा. सुरेखा डावरे
अंजली नृत्यालय साई कॉलनी, भुतकर वाडी, सावेडी,
अहमदनगर – ४१४००३, दूरध्वनी –०२४१–२४३०६९०,
मोबाईल ९८५००६२२१२
E-mail - davaresurekha@gmail.com

### पिंपरी, चिंचवड
मा. शकुंतला माटे (आविष्कार बालभवन)
प्लॉट नं १७, 'समर्थ' श्रीधरनगर, माटे शाळेजवळ, चिंचवड, पुणे ४११०३३
मोबाईल ९८२२८०६६८७, ९८२२८६८०७७
E-mail - indrayanipisolkar@yahoo.com

# नव्याने सुरु करण्यात आलेल्या परीक्षा

## ◈ जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षा (एकूण ४ परीक्षा) ◈

- **उद्देश :** जपान सरकारच्या प्रमाणपत्र परीक्षेची पूर्वतयारी होण्यासाठी, या भाषेची तोंडओळख व्हावी, ही भाषा लिहीता–वाचता यावी
- **परीक्षा :** एकूण ४ परीक्षा प्रत्येकी ५० गुण (३० गुण लेखी परीक्षा व २० गुण तोंडी परीक्षा) इंग्रजी व मराठी माध्यम
- **पात्रता :** कोणत्याही इयत्तेचा विद्यार्थी/इच्छुक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी/ पालक (वयाची अट नाही)
- **परीक्षा :** दरवर्षी ऑक्टोबर व मार्च महिन्यांत
- **परीक्षा शुल्क :** रु. २००/– प्रत्येकी (शैक्षणिक साहित्यासह),
- **मार्गदर्शन शुल्क :** संपूर्ण वर्षाचे (दोन परीक्षांचे एकत्र) शुल्क भरल्यास रु. १०००/– व एका परीक्षेसाठी रु. ६००/– प्रत्येक परीक्षेस (किमान २५ विद्यार्थ्यांची नोंदणी असलेल्या केंद्रावर (शाळेत) मार्गदर्शन हवे असल्यास नियम व अटी लागू)
- **ऑक्टोबर २०१४** सत्रातील परीक्षेस नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदत ३० जून २०१४ राहील.
- **मार्गदर्शन वर्ग वेळ :** शाळेच्या/केंद्राच्या सोयीनुसार शनिवार किंवा रविवार १ ते २ तास – प्रत्येक परीक्षेच्या अभ्यासक्रमासाठी २५ तास मार्गदर्शन देण्यात येईल. (अपेक्षित विद्यार्थी संख्या लक्षात घेवून मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांचे शुल्क जमा करण्यापूर्वी विद्यापीठाशी संपर्क साधावा.)

## ◈ हिन्दी भाषा परीक्षा (एकूण ३ परीक्षा) ◈

- **उद्देश :** शास्त्रशुद्ध व्याकरण, शुद्धलेखनातील तांत्रिक बारकावे, या गोष्टी सहज सोप्या होण्यासाठी
- **परीक्षेचे नाव :** १– हिन्दी प्रवेश परीक्षा २– हिन्दी प्रारंभ परीक्षा ३– हिन्दी प्रगति परीक्षा
- **पात्रता :** इयत्तेचे व वयाचे बंधन नाही. कोणत्याही परीक्षेस कोणत्याही इयत्तेचा विद्यार्थी बसू शकतो.
- **गुण :** ५० (वेळ २ तास) ◆ **माध्यम :** हिन्दी ◆ **परीक्षा सत्र :** दोन सत्र (सप्टेंबर व फेब्रुवारी)
- **मार्गदर्शकपुस्तिका :** मराठी माध्यमातून मागणीनुसार नाममात्र शुल्कात उपलब्ध
- **फेब्रुवारी २०१४** मध्ये फक्त प्रवेश परीक्षा घेण्यात येईल त्यानंतरच्या सप्टेंबर २०१४ सत्रात तिनही स्तराच्या परीक्षा घेतल्या जातील.

## विभागाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १. संस्कृतभाषाप्रारम्भः | – रु. १५/– | ८. हिंदी प्रवेश | – रु. ३०/– |
| २. संस्कृतभाषाप्रवेशः | – रु. २५/– | ९. लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक १ ले (इंग्रजी प्री–एलिमेंटरी व एलिमेंटरी परीक्षेसाठी) | – रु. ५०/– |
| ३. संस्कृतभाषापरिचयः | – रु. २५/– | | |
| ४. संस्कृतभाषाजिज्ञासा | – रु. ४०/– | १०.लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक २ रे (इंग्रजी इंटरमिडीएट व ज्युनियर परीक्षेसाठी) | – रु. ६०/– |
| ५. संस्कृतभाषारसास्वादः | – रु. ४०/– | | |
| ६. संस्कृतभाषाभिज्ञः | – रु. ४०/– | ११.लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक ३ रे (इंग्रजी सिनीयर व ॲडव्हांस परीक्षेसाठी) | – रु. ७०/– |
| ७. नृत्यकला अभ्यासक्रम मार्गदर्शक पुस्तिका | – रु. ५०/– | | |

**वरील सर्व पुस्तके पुढील ठिकाणी उपलब्ध आहेत : शालेय प्रसार परीक्षा विभागाची सर्व विभागीय कार्यालये व उज्ज्वल ग्रंथ भांडार / रवीन्दु बुक सेलर्स, ६८३, अप्पा बळवंत चौक, पुणे ३०, दूरध्वनी : ९९७५५८४३२२, २४४६२२६८**

- शालेय परीक्षांचे जुने प्रश्नसंच अत्यल्प किमतीत उपलब्ध आहेत.
- वरील पुस्तकांच्या किमान १० प्रती घेतल्यास पुस्तकाचे छापील किंमतीवर सवलत देण्यात येते.
- पुस्तक मागणीसाठी उज्वल ग्रंथ भांडार तसेच संबंधित विभागीय कार्यालयास दूरध्वनीवरुन संपर्क साधावा.

# प्रास्ताविक

शालेय स्तरावरील इ. ४ थी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी तसेच इंग्रजी, गणित, विज्ञान इ. विषयांच्या अभ्यासाचा त्यांचा पाया पक्का व्हावा या हेतूने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दरवर्षी इंग्रजी, गणित, विज्ञान, संस्कृत, मराठी भाषा इत्यादी विषयांच्या परीक्षा वर्षातून फेब्रुवारी/सप्टेंबर या महिन्यांत घेतल्या जातात. तळागाळातील सर्वांना शिक्षण मिळावे. शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन व्हावे या उद्देशाने विद्यापीठ या परीक्षांचे आयोजन करीत असते. या परीक्षांचा अभ्यासक्रम शासनाने तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमास उपयुक्त व पूरक असल्याने या परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झालेल्या आहेत. शाळांमधील परीक्षांच्या गुणवत्ता यादीत येण्यासाठी या परीक्षांचा अभ्यास प्रेरक ठरला आहे. **शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या या परीक्षांचा उपयोग शालान्त परीक्षेच्या तयारीसाठी झाल्याचे अभिमानाने नमूद केलेले आहे. गेली अनेक वर्षे शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचे काम या परीक्षांच्या माध्यमातून विद्यापीठ करीत आहे.**

विद्यापीठ नियमित विषयांच्या परीक्षांबरोबर On Line धर्तीवर संगणक विषयाच्या SLCIT (School Level Course In Information Techonology) परीक्षा व स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर FFCE (Foundation For Competitive Exam) या परीक्षांचे आयोजन करीत आहे. भविष्यातील व्यावसायिक शिक्षण पद्धतीला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी अशा परीक्षांची तोंडओळख व्हावी याच उद्देशाने विद्यापीठात या परीक्षा घेण्यात येतात.

बहुसंख्य शाळांच्या मागणीनुसार संस्कृत विषयाप्रमाणेच हिन्दी विषयाच्या परीक्षा आहेत तसेच, शालेय स्तरावर परदेशी भाषांचे ज्ञान अवगत व्हावे, लहान वयातच नवीन भाषेची गोडी निर्माण व्हावी यासाठी जपानी भाषेचे सुरुवातीपासून मार्गदर्शन व्हावे ही भाषा लिहीता, वाचता, बोलता यावी. भविष्यात जपानी सरकारची प्रमाणपत्र परीक्षा देता यावी यासाठी विद्यापीठामार्फत Sub Junior Course in Japanese Language ही परीक्षा सप्टेंबर २०१३ पासून सुरु केली आहे. या उपक्रमाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. या परीक्षांबाबत सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

# शालेय परीक्षांची वैशिष्ट्ये

१. दरवर्षी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सुमारे २००० पेक्षा जास्त शाळांमधून दोन लाख विद्यार्थी विद्यापीठाच्या शालेय परीक्षांना बसतात. विविध विषयांच्या इ.४थी ते १०वीसाठी जवळपास ६० परीक्षा वर्षातून दोन सत्रांत घेतल्या जातात.

२. **आकर्षक पारितोषिके –** विविध विषयांच्या प्रत्येक परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांमध्ये गुणानुक्रमे पहिल्या दोन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, गौरवचिन्ह व विशेष प्रमाणपत्रे देण्यात येतात. तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. सर्व विषयांच्या प्रत्येक परीक्षेस प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करणा-या विषय शिक्षकांना विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. (तपशील पान क्र. ९ पहावे.)

३. **अध्यापक मानधन –** शाळांना परीक्षा व्यवस्थेसाठी होणारा सेवा खर्च व परीक्षांसाठी मार्गदर्शन करणा-या शाळेतील अध्यापकांना मानधन म्हणून साधारणतः परीक्षा शुल्काच्या २५% इतकी रक्कम दिली जाते. त्यामुळे शाळेला कोणताही आर्थिक बोजा सहन करावा लागत नाही.

४. **मेळावे –** या परीक्षांचा फायदा शहरी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घेता यावा तसेच या परीक्षांची माहिती अध्यापकांना व विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार अध्यापक मेळावे आयोजित केले जातात.

५. **विभागीय कार्यालय –** शाळांना स्थानिक पातळीवर तत्पर सेवा उपलब्ध व्हावी यासाठी निवडक जिल्हयांमध्ये विभागीय कार्यालय व विद्यापीठाच्या शाखा सुरू केल्या आहेत..

६. नियमित विषयांच्या परीक्षांबरोबरच सध्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची तोंड ओळख होण्यासाठी School Level Course In Information Techonology परीक्षा व Foundation For Competitive Exam या परीक्षांचे आयोजन केले गेले आहे.

७. **हिन्दी भाषा व जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षा नविन परीक्षांची सुरुवात –** शाळेच्या मागणीनुसार परीक्षा शुल्कातच विद्यापीठ जापनीज भाषेच्या मार्गदर्शनासाठी व्यवस्था करण्यात येते. याबाबत सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

८. अनेक शाळांमध्ये नृत्यकला विषय सुरू करण्याची इच्छा असते मात्र कमी मानधनात नृत्यकला विषय शिक्षक उपलब्ध होत नसल्याने हा विषय शाळेत घेता येत नाही. शाळांची ही गैरसोय विचारात घेऊन शक्य होईल अशा शाळांमधून मागणीनुसार परीक्षेस नोंदणी करणा–या विद्यार्थ्यांस नाममात्र शुल्कात नृत्यकला विषयाचे मार्गदर्शन विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील.

## अत्यंत महत्त्वाच्या सूचना

विद्यापीठातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात येतात. त्या संदर्भात काही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे –

- प्रत्येक विषयाच्या परीक्षेस किमान २० विद्यार्थी असतील तरच त्या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाते.
- २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असूनही परीक्षा केंद्र मागणी करणा–या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाईल. मात्र शुल्कातील केंद्र खर्च व अध्यापक मानधन दिले जाणार नाही. त्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल
- ज्या शाळांमधून या परीक्षा घेतल्या जात नाहीत अशा शाळेतील विद्यार्थ्यांना नजिकच्या विभागीय कार्यालयात/ विद्यापीठात **बहिस्थ विद्यार्थी** म्हणून परीक्षा देता येईल. (मार्गदर्शन करणाऱ्या क्लासेससाठी या परीक्षेला विद्यार्थ्यांना बसवता येईल.)

### नवीन केंद्र व केंद्र क्रमांक

१. शाळेला नवीन केंद्र सुरु करावयाचे असल्यास त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावांच्या यादीबरोबरच खाली दिलेल्या मुद्दयांप्रमाणे केंद्र सुरु करण्यासाठीचे विनंती पत्र द्यावे. अगोदर केंद्र परवानगीचे मंजुरी पत्र पाठविण्याची गरज नाही. ते विद्यार्थी यादीबरोबरच पाठवावे. संबंधित शाळेस परीक्षेच्या अगोदर विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या आसन क्रमांकांच्या यादीबरोबरच केंद्र क्रमांक कळविण्यात येईल. त्यानंतर पुढील सर्व परीक्षांसाठी तोच केंद्र क्रमांक कायम राहील.

**केंद्र सुरू करण्यासाठीच्या अर्जाचे मुद्दे** – शाळेचे नाव – पूर्ण पत्ता ( मु.पो.,ता. जि., पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई.मेल आय डी.) – शाळा (केंद्र) संचालक/मुख्याध्यापकांचे संपूर्ण नाव – शाळेची एकूण विद्यार्थी संख्या – शाळेचे माध्यम –(प्राथमिक, माध्यमिक) – गावात नियमित टपाल मिळते का? (पोस्ट/कुरीयर)– शाळेत संगणक लॅब आहे का?

२. आपल्या केंद्राची नोंदणी झाल्यावर नेहमीसाठी विद्यापीठाने दिलेला कायमचा केंद्र क्रमांक प्रत्येक यादीवर व पत्रव्यवहारावर लिहावा. प्रत्येक परीक्षेसाठी त्या शाळेला एकच केंद्र क्रमांक राहील. परीक्षा शुल्काच्या डी.डी. च्या मागे कायमचा केंद्र क्रमांक व शाळेचे नाव लिहावे.

### शुल्क व यादी पाठविताना

१. विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी पाठविताना पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे यादी तयार करून योग्य त्या शुल्कासह पाठवावी. शक्य असल्यास संगणकावार एम. एस. ऑफिस एक्सेल शीटमध्ये यादी तयार करून एक हार्ड कॉपी (प्रिंट यादी) व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) पाठवावी. किंवा विभागाच्या E-mail: shaleyaprasar@yahoo.com यावर Attachment मध्ये यादी पाठवावी. यापुढे जलद संपर्कासाठी मेलचा वापर केला जाणार आहे. आपणही आपला पत्रव्यवहार ई–मेल आयडीद्वारे करावा. हाताने लिहिलेल्या याद्या स्वच्छ व सुबक हस्ताक्षरात असाव्यात.

**यादीसाठीचा मजकूर पुढील मुद्दयानुसार असावा** – शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पीन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल आय डी. –परीक्षेचा विषय व परीक्षेचे नाव – परीक्षा कोड क्र.– ☐☐☐ (शुल्क तक्त्यावर पहावा) केंद्र क्र. – ☐☐☐☐☐ विषय शिक्षकाचे नाव (पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या शिक्षकांना गौरविण्यासाठी आवश्यक तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी), इयत्तेनुसार वेगळे शिक्षक असल्यास त्याप्रमाणे नाव व मोबाईक क्र. कळवावे – शाळा माध्यम – मराठी/इंग्रजी/हिंदी **(यादी एम.एस.ऑफीस मध्ये एक्सेल शीटमध्ये आडनाव, नाव, वडिलांचे नाव हे वेगवेगळ्या रकान्यात टाईप करुन पाठवावे.)**

| Sr. No. | Surname | First Name | Middle Name | Std. |
|---|---|---|---|---|
| 1 | RAUT | RAMESH | RAMCHANDRA | 6TH |

२. विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या (संगणकाद्वारे टंकलेखित केलेल्या) सर्व विषयांसाठी इंग्रजीतूनच (Capital Letters Only) पाठवाव्यात. आपली शाळा इंग्रजी माध्यम किंवा मराठी माध्यम आहे याचा स्पष्ट उल्लेख यादीत असावा.

### शुल्काबाबत

**परीक्षार्थींनी मार्गदर्शन करणा–या शिक्षकांना वाढीव मानधन मिळावे. शाळांना वाढीव केंद्रखर्च मिळावा या उद्देशाने तसेच कागद व छपाई खर्चात झालेली वाढ, प्रशासकीय व शैक्षणिक वाढीव खर्चामुळे फेब्रुवारी २०१३ सत्रापासून सर्व परीक्षांच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे. तशी कृपया सर्व शाळांच्या मुख्याध्यापक/शिक्षकांनी सहाकर्य करावे. शुल्क तक्त्यामधील कॉलम २ मधील रक्कम शिक्षकांना मानधन व केंद्रखर्च म्हणून शुल्कातून घ्यावयाची आहे.**

शुल्काच्या हिशोबात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सुटसुटीत शुल्काचा तक्ता तयार केला आहे.(शुल्क तक्ता पहावा) त्यानुसार **शाळांनी विभागीय कार्यालयाच्या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन टपाल/ कुरीयरचा खर्च वाचवावा.** नमुन्याप्रमाणे यादी पाठविताना त्यासोबत सर्व परीक्षांच्या एकत्रित किंवा प्रत्येक विषयाचा स्वतंत्र (शाळेच्या सोयीप्रमाणे) शुल्काचा हिशोब खाली दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे करून पाठवावा.

शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल इ. – परीक्षेचे नाव –
परीक्षा कोड क्र.– ☐☐☐ केंद्र क्र. – ☐☐☐☐☐☐

| परीक्षा कोड | विषय | विद्यार्थिसंख्या X शुल्क * | रक्कम |
|---|---|---|---|
| २१ | इंग्रजी | ५० X ३५ | १७५० |
| ४४ | गणित | ७५ X ४५ | ३३७५ |
| | | **एकूण** | **५१२५** |

* शुल्क तक्ता रकाना ३ प्रमाणे विद्यापीठाकडे पाठविण्याची एकूण रक्कम – रु. ५१२५/–

बँकेचे नाव :________________ MT/ डी.डी. नं. व दिनांक :__________________

मुख्याध्यापक : स्वाक्षरी /शिक्का

## शुल्क पाठविताना घ्यावयाची काळजी

१. शुल्क पाठविताना कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्ट मा. कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या नावाने काढून याद्यांसोबत विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावा. डी.डी. व्यतिरिक्त आपण यूको बँकेच्या विद्यापीठाच्या खाते क्र. १६८४०१००००६१११ व बँक ऑफ महाराष्ट्रचा खाते क्र. २००२७०५२४६१ मध्ये स्थानिक बँकेच्या शाखेमधून मनी ट्रान्सफर ने शुल्क जमा करता येईल.

२. मनी ट्रान्सफर ने बँकेत पैसे भरल्याच्या मूळ पावतीची एक झेरॉक्स आपणाजवळ ठेवावी व मूळ पावती याद्यांसोबत शुल्काच्या तपशिलासह विद्यापीठाच्या **शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे किंवा विभागीय कार्यालयाकडे** पाठवावी. शुल्क भरल्याची पावती असेल तरच याद्या स्वीकारल्या जातील. **मनीऑर्डर स्वीकारली जाणार नाही**.

३. विद्यापीठात सोमवार ते शुक्रवार स. ११ ते १ व १.३० ते ४.३० वाजेपर्यंत समक्ष याद्या व रोख शुल्क स्वीकारले जाईल. विभागीय कार्यालयात याद्या व शुल्क स्वीकारण्याच्या वेळेसाठी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

## परीक्षेपूर्वी व परीक्षेनंतर

१. यादी प्राप्त झाल्यानंतर विषयवार परीक्षांप्रमाणे प्रत्येक केंद्रांना विद्यार्थ्यांच्या आसन क्रमांकांची यादी (उपस्थिती पत्रक) व आवश्यक त्या उत्तरपत्रिका (प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकच असते) परीक्षेपूर्वी किमान ५ दिवस आधी विद्यापीठाकडून/विभागीय कार्यालयाकडून शाळांना वितरित केल्या जातात. त्यातील **स्वतंत्र पाकिटात असलेली आसन क्रमांकाची यादी आपण पाठविलेल्या यादीप्रमाणे बरोबर असल्याची परीक्षेपूर्वी खात्री करून घ्यावी. सर्व परीक्षा विद्यापीठाने निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच घ्याव्यात.**

२. उपस्थितिपत्रकावर परीक्षेस उपस्थित असणा–या विद्यार्थ्याची त्याच्या नावापुढे सही घ्यावी. अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या नावापुढे लाल पेनने अनुपस्थित लिहावे. अनुपस्थित क्रमांकावर ऐनवेळच्या दुस–या विद्यार्थ्यांचे नाव टाकू नये हे ग्राह्य धरले जाणार नाही. उपस्थितिपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. यादीत नाव नसल्यास तसेच परीक्षेस ऐनवेळी बसणा–या विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व परीक्षा शुल्क विलंब शुल्कासहित उत्तरपत्रिकेबरोबरच पाठवावे. सदर विद्यार्थ्यांस त्या परीक्षेच्या उपस्थिती पत्रकावरील शेवटचा आसन क्रमांक देऊन त्यापुढे A/B/C असे लिहावे. **उदा.** शेवटचा आसन क्र. १०१ असल्यास त्यापुढील ऐनवेळच्या पहिल्या विद्यार्थ्यास १०१ A दुस–या विद्यार्थ्यास १०१ B या प्रमाणे आसन क्र. द्यावेत. आसन क्रमांकाच्या यादीतील नावांमध्ये काही दुरूस्त्या असल्यास उपस्थितिपत्रकावर संबंधित नावाला/शब्दाला/अक्षराला लाल पेनने गोल करून सुधारणा करावी किंवा स्वतंत्र कागदावर आसन क्रमांकासह चुकीचे नाव व त्यापुढे सुधारित नाव अशी यादी पाठवावी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या नावावरच प्रमाणपत्र दिली जातात त्यामुळे विषय शिक्षकांनी नावात चूक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. परीक्षा झाल्यानंतर दुस–याच दिवशी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व उपस्थितिपत्रक समक्ष, टपालाद्वारे किंवा कुरिअरने विद्यापीठाकडे/विभागीय केंद्राकडे पाठवव्यात. उत्तरपत्रिका एस.टी. पार्सलने पाठवू नयेत.

४. परीक्षा निर्णयाबाबत व प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यास निर्णय जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांपर्यंत विद्यापीठाच्या शालेय परीक्षा विभागाकडे संपर्क साधावा. परीक्षा निर्णयानंतर पुढील परीक्षेपूर्वी उत्तरपत्रिका निर्लेखित केल्या जातात.

५. परीक्षा निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे पुनर्निरीक्षणासंबंधीचे अर्ज मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्यामार्फत स्वीकारण्यात येतात. प्रत्येक उत्तरपत्रिकेसाठी रु. २०/– याप्रमाणे पुनर्निरीक्षण शुल्क अर्जासोबत पाठवावे लागते. डुप्लिकेट प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ३०/– रुपये शुल्क आकारण्यात येते.

६. **केंद्रांनी तात्काळ सेवेसाठी जास्तीत जास्त ई–मेल सुविधेचा वापर करावा.**

वरील सर्व सूचनांची नोंद घ्यावी व परीक्षेबाबत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती. **– कार्यवाह**

---

## प्रचारक

विद्यापीठाच्या शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या या विविध विषयांच्या परीक्षांबाबतचा उपक्रम जास्तीत जास्त शाळांना माहीत व्हावा या उद्देशाने विद्यापीठ प्रचारक नियुक्त करीत आहे. नव्याने नोंदणी करणा–या शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार प्रचारकांना मानधन देण्यात येईल. इच्छुक व्यक्तींनी दूरध्वनीवरून वा प्रत्यक्ष विभागाशी संपर्क साधावा.

---

## पारितोषिके

- शालेय स्तरावरील संस्कृत, मराठी, इंग्रजी, विज्ञान व गणित या विषयांच्या सर्व परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणा–या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. २००/– व रु. १००/– ऐवजी कायमस्वरुपी प्रेरणा मिळण्यासाठी गौरवचिन्ह व विशेष प्रमाणपत्र दिले जाणार आहे.
- विषयांमधील प्रत्येक परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या विषय शिक्षकास विशेषप्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाते.
- सर्व विषयांत मिळून प्रत्येक सत्रास ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेस बसविणा–या शाळांना भेटवस्तू व प्रशंसाप्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.
- वक्तृत्व स्पर्धेस प्रथम क्रमांकास रु.१०००/– द्वितीय क्रमांकास रु. ७००/– तृतीय क्रमांकास रु. ५००/– व उत्तेजनार्थ रु. ३००/– रोख पारितोषिक दिले जाते.
- **नविन पारितोषिके** – सत्र सप्टेंबर २०१३ पासून विद्यापीठातर्फे खालील परीक्षांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खालील पारितोषिके जाहिर करण्यात आली आहेत. (सर्व पारितोषिके प्रथम क्र रोख रु. २००/– व द्वितीय क्र रोख रु.१००/– गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना ही पारितोषिके शाळेच्या पत्त्यावर मनिऑर्डरने पाठविली जातील.)

१. **भागवत पारितोषिक –** गणित पहिली, तिसरी व पाचवी परीक्षा (प्रथम क्र.)

२. **लोकमान्य टिळक पारितोषिक** – गणित पहिली, तिसरी व पाचवी परीक्षा (द्वितीय क्र.), जपानी भाषा स्तर १, स्तर ३ व स्तर ५ (प्रथम क्र.)

३. **कै. गुरुदेव रानडे पारितोषिक** – जपानी भाषा स्तर १, स्तर ३ व स्तर ५ (द्वितीय क्र.), एफ.एफ.सी.ई स्तर १, स्तर ३ व स्तर ५ (प्रथम व द्वितीय क्र.) हिंदी तिनही परीक्षा (प्रथम व द्वितीय क्र.) नृत्यकला पदविका (भरतनाटयम्) (प्रथम व द्वितीय क्र.)

४. **डॉ. पंडिता सुजाता नातू पारितोषिक –** नृत्यकला पदविका (कथक) (प्रथम क्र. रु. ३००/– व द्वितीय क्र. २००/–)

# परीक्षा शुल्क तक्ता

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| | **एस.एल.सी.आय.टी. परीक्षा (मराठी व इंग्रजी माध्यम) संगणक विषय परीक्षा** | | | |
| ०१ | SLCIT Level 1 इ. ५वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०२ | SLCIT Level 2 इ. ६वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०३ | SLCIT Level 3 इ. ७वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०४ | SLCIT Level 4 इ. ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०५ | SLCIT Level 5 इ. ९वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०६ | SLCIT Level 6 इ. १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| | **संस्कृत** | | | |
| ११ | संस्कृतभाषाप्रारम्भः (प्रथमा) इ.५वी (तोंडी) | ३५.०० | १५.०० | २०.०० |
| १२ | संस्कृतभाषाप्रवेशः (द्वितीया) इ.६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| १३ | संस्कृतभाषापरिचयः (तृतीया) इ. ७ वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| १४ | संस्कृतभाषाजिज्ञासा (चतुर्थी) इ. ८ वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| १५ | संस्कृतभाषारसास्वादः (पंचमी) इ. ९ वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| १६ | संस्कृतभाषाभिज्ञः (षष्ठी) इ. १० वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **इंग्रजी** | | | |
| २१ | इंग्रजी प्री-एलिमेंटरी इ. ५वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| २२ | इंग्रजी एलिमेंटरी इ.६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| २३ | इंग्रजी इंटरमिडीएट इ.७वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| २४ | इंग्रजी ज्युनियर इ. ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| २५ | इंग्रजी सिनीयर इ. ९ वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| २६ | इंग्रजी ॲडव्हांस इ. १० वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **मराठी उच्चस्तर** | | | |
| ३१ | मराठी उच्चस्तर पहिली इ.५वी व ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ३२ | मराठी उच्चस्तर दुसरी इ.७ वी व ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ३३ | मराठी उच्चस्तर तिसरी इ.९वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ३४ | मराठी उच्चस्तर चौथी इ.१०वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **मराठी निम्नस्तर** | | | |
| ३५ | मराठी निम्नस्तर पहिली इ.५वी व ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ३६ | मराठी निम्नस्तर दुसरी इ.७वी व ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| ३७ | मराठी निम्नस्तर तिसरी इ.९वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ३८ | मराठी निम्नस्तर चौथी इ.१०वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **गणित** | | | |
| ४१ | गणित प्रवेश इ. ४थी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ४२ | गणित पहिली इ.५वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ४३ | गणित दुसरी इ. ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ४४ | गणित तिसरी इ. ७वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ४५ | गणित चौथी इ. ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ४६ | गणित पाचवी इ. ९वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ४७ | गणित सहावी इ. १०वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ४८ | सा. गणित पाचवी इ.९वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ४९ | सा. गणित सहावी इ.१०वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **विज्ञान (फक्त फेब्रु. सत्रात)** | | | |
| ५१ | विज्ञान परीक्षा पहिली इ. ५वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ५२ | विज्ञान परीक्षा दुसरी इ. ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ५३ | विज्ञान परीक्षा तिसरी इ. ७वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ५४ | विज्ञान परीक्षा चौथी इ. ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ५५ | विज्ञान परीक्षा पाचवी इ. ९वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| ५६ | विज्ञान परीक्षा सहावी इ. १०वी | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **इंग्रजी संभाषण** | | | |
| ६१ | इंग्रजी संभाषण पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | ३५.०० | १५.०० | २०.०० |
| ६२ | इंग्रजी संभाषण दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ४०.०० | १५.०० | २५.०० |
| ६३ | इंग्रजी संभाषण तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ५०.०० | २०.०० | ३०.०० |
| | **मराठी पाठांतर** | | | |
| ७० | मराठी पाठांतर पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | ३५.०० | १५.०० | २०.०० |
| ७१ | मराठी पाठांतर दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ४०.०० | १५.०० | २५.०० |
| ७२ | मराठी पाठांतर तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ५०.०० | २०.०० | ३०.०० |
| | **मराठी लेखन कौशल्य** | | | |
| ७३ | मराठी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ७४ | मराठी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ ✻ रूपये | कॉलम २ ✻✻ रूपये | कॉलम ३ ✻✻✻ रूपये |
|---|---|---|---|---|
| | **इंग्रजी लेखन कौशल्य** | | | |
| ७५ | इंग्रजी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ७६ | इंग्रजी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| | **नृत्यकला भरतनाटयम्** | | | |
| ८१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ८२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ८३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ८४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| | **नृत्यकला कथक** | | | |
| ९१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ९२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ९३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| | **फाऊंडेशन फॉर कॉंपिटेटीव्ह एक्झाम स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी** | | | |
| १०१ | FFCE Level 1 इ. ५वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०२ | FFCE Level 2 इ. ६वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०३ | FFCE Level 3 इ. ७वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०४ | FFCE Level 4 इ. ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०५ | FFCE Level 5 इ. ९वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०६ | FFCE Level 6 इ. १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| | **हिन्दी** | | | |
| ११५ | हिन्दी प्रवेश परीक्षा | ५०.०० | १५.०० | ३५.०० |
| ११६ | हिन्दी प्रारंभ परीक्षा (सप्टें २०१४ पासून सुरु) | ६०.०० | १५.०० | ४५.०० |
| ११७ | हिन्दी प्रगति परीक्षा (सप्टें २०१४ पासून सुरु) | ७०.०० | २०.०० | ५०.०० |
| | **जपानी भाषा (मार्गदर्शन शुल्काव्यतिरिक्त)** | | | |
| १२१ | शोदान १ | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२२ | शोदान २ | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२३ | चूडदान १ | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२४ | चूडदान २ | २००.०० | ५०.०० | १५०.०० |

**शुल्क तक्त्यात** ✻ कॉलम १ – विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे शुल्क, ✻✻ कॉलम २ – शाळेकडे ठेवायचे शुल्क ✻✻✻ कॉलम ३ – विद्यापीठाकडे पाठवावयाचे शुल्क (**कॉलम २** मध्ये अध्यापक मानधन सरासरी २५% + सेवाखर्च सरासरी १% + केंद्रप्रमुख मानधन सरीसरी १ ।। ते २% देण्यात येते.) **टिप :** मुदतीनंतर शुल्क पाठविल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस रु. ५/– व नृत्यकलेच्या विद्यार्थ्यांस रु. २०/– विलंब शुल्क आकारले जाईल.

# विभागीय कार्यालय

१. शाळांना (केंद्रांना) तत्पर सेवा मिळावी, टपालाद्वारा/कुरीयरने होणारा खर्च, विलंब व अनिश्चितता टाळण्याच्या उद्देशाने काही निवडक जिल्हयांच्या ठिकाणी विद्यापीठाच्या शाखा/विभागीय केंद्र सुरू करण्यात आली आहेत. त्याची सविस्तर माहिती माहितीपुस्तिकेत सुरुवातीस देण्यात आली आहे.

२. या केंद्रांवर परिसरातील/जिल्हयातील शाळांसाठी खालील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तरी शाळांनी त्याचा लाभ घ्यावा.

• परीक्षा याद्या व शुल्क स्वीकारणे. • परीक्षा साहित्य शाळांना/ केंद्रांना वितरित करणे. • परीक्षा कालावधीत शाळांना/केंद्रांना भेटी देणे. • परीक्षा झाल्यानंतर शाळांतून/केंद्रांतून येणा–या उत्तरपत्रिका स्वीकारणे. परीक्षांचा निर्णय व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र शाळांना वितरीत करणे. • पुस्तक विक्री, विविध मेळावे व कार्यशाळा यांचे आयोजन. • परीक्षांबाबत शाळांच्या शंका, सूचना, तक्रारी सोडविण्यासाठी विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

३. विद्यापीठाच्या शाखा/विभागीय कार्यालयाच्या परिसरातील शाळांनी केंद्रासाठी अथवा परीक्षांच्या सर्व प्रकारच्या कामांसाठी पुणे मुख्य कार्यालयाशी संपर्क न साधता त्या जिल्हयातील/परिसरातील विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा.

४. ज्या केंद्रांच्या जवळपास शाखा/विभागीय कार्यालये नाहीत अशा केंद्रांनी परीक्षांबाबत पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

५. शाखांमधून किंवा विभागीय कार्यालयातून चालणा–या सर्व कामावर तसेच सर्व विषयाच्या परीक्षांवर विद्यापीठाचे संपूर्ण नियंत्रण राहील. विभागीय कार्यालय हे विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम करतील. विभागीय कार्यालयांना विद्यापीठाकडून सर्व कामकाजासाठी मानधन दिले जाते. त्यामुळे विद्यापीठ शुल्काव्यतिरीक्त इतर कोणतीही जादाची रक्कम शाळांनी विभागीय कार्यालयास देऊ नये. भविष्यात इतरही जिल्हयांमध्येही मागणीनुसार विभागीय कार्यालय सुरू करण्यात येतील.

# मराठी, इंग्रजी व हिंदी माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा

विद्यापीठातर्फे दरवर्षी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्ताने मराठी, इंग्रजी व हिंदी माध्यमातून वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व गुण वाढीस लागावेत, विषयाची मांडणी करता यावी, त्याचबरोबर मान्यवर नेत्यांच्या आदर्श जीवन पद्धतीचा अभ्यास व्हावा या हेतूने या स्पर्धा आयोजित केल्या जातात. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांची चरित्रे व कार्य आणि चालू घडामोंडींवर आधारित असे विषय स्पर्धेसाठी असतात. या स्पर्धा तीन गटांत घेण्यात येतात. (गट क्र १–इ. ५वी व ६वी, गट क्र २–इ. ७वी व ८वी व गट क्र ३–इ. ९वी व १०वी) पुणे जिल्हयातील शाळांप्रमाणेच या स्पर्धेस इतर जिल्हयांतील शाळाही सहभागी होऊ शकतात. मात्र स्पर्धेस येणासाठी कोणताही प्रवास खर्च दिला जात नाही. स्पर्धेच्या कार्यक्रमाचा तपशील वार्षिक कार्यक्रमामध्ये दिलेला आहे. कृपया, तो पहावा. **स्पर्धेची पारितोषिके– मराठी, इंग्रजी व हिंदी माध्यमाच्या स्पर्धेसाठी प्रत्येक गटास खालीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येतात.** प्रथम पारितोषिक– रु.१०००/– द्वितीय पारितोषिक – रु.७००/– तृतीय पारितोषिक– रु.५००/– उत्तेजनार्थ पारितोषिक– रु.३००/– विभागून. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते तसेच सर्व गटांत मिळून जास्तीत जास्त क्रमांक मिळविण्या–या शाळेस सर्वसाधारण विजेतेपद दिले जाते. अशा शाळेस स्मृतिचिन्ह व दुर्मिळ ग्रंथ देऊन गौरविण्यात येते. पुणे, सांगली, रत्नागिरी विभागीय कार्यालयातूनही या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. याबाबत शाळांनी नजीकच्या विभागीय कार्यालयाशी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात संपर्क साधावा.

# परीक्षांचे स्वरूप

## ◈ School Level Course In Information Techonology (SLCIT)

**(एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ०१ ते ०६)**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये संगणकाचे ज्ञान वाढावे हा उद्देशाने SLCIT ही परीक्षा सुरू केल्या आहोत. सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे, अनेक क्षेत्रांमध्ये जसे बँकिंग, विमा, पर्यटन, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी, संरक्षण या क्षेत्रांमध्ये संगणकाने प्रवेश केला आहे. त्यामुळे भविष्यात संगणक येणे गरजेचे असून प्रत्येकाला त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. भविष्यात या परीक्षांचा फायदा नक्कीच विद्यार्थ्यांना होईल. अगदी सुरुवातीपासूनच म्हणजे एम.एस.सी.आय.टी. च्या परीक्षेपासून सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये संगणक हा अधिक महत्त्वाचा विषय समजला जातो त्यामुळे या परीक्षा त्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

**केंद्रासाठी आवश्यक बाबी :** १) संगणकाचे किमान ज्ञान असणारा मार्गदर्शक (शिक्षक) २) खाली दिलेल्या तपशीलानुसार शाळेकडे किमान ५ संगणक असावेत. ते लॅन ने एकमेकांना जोडलेले असावे. ३) सर्व स्तराच्या (Level) परीक्षांसाठी मिळून किमान ५० विद्यार्थ्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. ४) नव्याने केंद्र सुरू केलेल्या शाळांना सुरुवातीच्या काही परीक्षांसाठी त्यांच्या मागणीनुसार लागणारे तांत्रिक सहाय्य पुरविण्यात येईल. ५) परीक्षेस विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर संबंधित शाळांना नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची आसन क्रमांकानुसार नोंदणीची सीडी दिली जाईल त्यामध्ये परीक्षेबाबतच्या सर्व सूचना व आवश्यक माहिती दिलेली असेल. याबाबतची स्वतंत्र सीडी विभागीय कार्यालयाकडे सुद्धा उपलब्ध असेल. ६) सर्व स्तरातील परीक्षा इयत्तावार शासनाने तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. ७) या सर्व परीक्षा शालांत परीक्षा झाल्यानंतर येणा–या रविवारी घेण्यात येतील.

**Setup Requirements (Pre requisites) Server : Hardware -** PIV 2.0 GHz, 512 MB RAM, 52x CD/DVD ROM, 4 GB HDD, 100 MBPS Network Card, Monitor with 1024 X 768 Resolution, Laser Jet Printer (Only records Purpose), UPS (optional), **Software -** OS: MS Windows XP with SP2/SP3, MS Office 2003 **Client : Hardwar -** PIV 1.7 GHz, 256 MB RAM, 2 GB HDD, 100 MBPS Network Card, Monitor with 1024 X 768 Resolution, Laser Jet Printer (Only records Purpose), UPS (optional), **Software -** OS: MS Windows XP with SP2/SP3, MS Office 2003.

## ◈ संस्कृत (एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ११ ते १६)

भारतीय संस्कृतीमध्ये सर्वात प्राचीन अशी भाषा म्हणून संस्कृत भाषेचा उल्लेख केला जातो. याच संस्कृतीमध्ये उपलब्ध असणारे प्राचीन ग्रंथ, वेद समजण्यासाठी संस्कृत भाषा समजणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याच्या माध्यमातून संस्कृत विषयाचा पाया मजबूत व्हावा व शालेय विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेची गोडी निर्माण व्हावी या हेतूने इ. ५वी ते १०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सहा परीक्षा फेब्रुवारी व सप्टेंबर सत्रांत घेतल्या जातात. प्रारभः (प्रथमा) परीक्षा तोंडी स्वरूपाची असते. सर्व परीक्षा १०० गुणांच्या आहेत. **संस्कृत अभिज्ञः (षष्ठी) ही परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतली जाते.** या परीक्षांसाठी उपयुक्त अशी पुस्तके विद्यापीठाने नव्याने तयार केलेली आहेत. नविन पुस्तकाच्या रचनेनुसार परीक्षांच्या नावामध्येही बदल करण्यात आले आहेत. संस्कृत परीक्षांसाठी नोंदणी करणा–या सर्व शाळांना ही पुस्तके भेटप्रत म्हणून देण्यात आली आहेत.

## ◈ इंग्रजी (एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. २१ ते २६)

सर्वसाधारण प्री-एलिमेंटरी ५वीसाठी, एलिमेंटरी ६वी साठी, इंटरमिडीएट ७वी साठी, ज्युनियर ८वी साठी व सिनीयर ९वी साठी व ॲडव्हांस १०वी साठी या इयत्तांचे विद्यार्थी बसू शकतात. १०० गुणांची इंग्रजीची प्रश्नपत्रिका व्याकरणावर आधारित असते. मात्र प्रश्नपत्रिका तयार करताना संबंधित इयत्तांना अपेक्षित असणा-या व्याकरणाचा विचार केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाच्या व्याकरणाचा पाया पक्का तयार होतो. तसेच इंग्रजी सिनीयर व ॲडव्हांस या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप एस.एस.सी. बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेच्या नवीन सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे करण्यात आले आहे. इ. ५वी ते १०वी च्या इंग्रजी व्याकरणासाठी उपयुक्त अशी पाठयपुस्तके विद्यापीठाने तयार केलेली आहेत. नोंदणी केलेल्या शाळांना या पुस्तकांच्या भेट प्रती पाठविल्या आहेत. या पुस्तकांचा फायदा/उपयोग विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेविषयी असणारी भिती दूर होवून त्यांच्यातील आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी होईल. तसेच, विद्यार्थ्यांना पाठयपुस्तका व्यतिरीक्त शिक्षण देणे शक्य होईल. *इंग्रजी व मराठी माध्यमाप्रमाणे शाळेच्या मागणीनुसार हिन्दी व उर्दू माध्यमातून प्रश्नपत्रिका काढण्यात येईल. अशा शाळांनी विभागाच्या दूरध्वनी क्रमांकावर स्वतंत्र संपर्क साधावा.*

---

## ◈ मराठी (एकूण ८ परीक्षा, उच्चस्तर ४, परीक्षा कोड क्र. ३१ ते ३४ निम्नस्तर ४ परीक्षा कोड क्र. ३५ ते ३८)

मराठी विषयाचा अभ्यास विद्यार्थ्यांकडून व्हावा या उद्दिष्टाने व शालेय अभ्यासाला पूरक अशा मराठी भाषा परीक्षांचे आयोजन केले आहे. मराठी उच्चस्तर पहिली इ. ५वी व ६ वीसाठी **(यापूर्वी पहिल्या परीक्षेत इ. ७ वीचा समावेश होता परंतु आता इ. ७वी साठी उच्चस्तर दुसरी ही परीक्षा असेल)**, मराठी उच्चस्तर दुसरी ७ वी व इ. ८ वीसाठी, मराठी उच्चस्तर तिसरी इ. ९वीसाठी, मराठी उच्चस्तर चौथी इ. १० वीसाठी, मराठी निम्नस्तर पहिली इ. ५वी व ६वीसाठी, मराठी निम्नस्तर दुसरी इ. ७वी व ८वीसाठी, मराठी निम्नस्तर तिसरी इ. ९वीसाठी व मराठी निम्नस्तर चौथी १० वीसाठी अशी इयत्तावार विभागणी आहे. विद्यार्थ्यांची मराठी भाषेच्या व्याकरणाची तयारी चांगल्या रीतीने व्हावी यासाठी या परीक्षा सुरू केल्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी निम्नस्तर परीक्षेस व मराठी माध्यमाच्या शाळांनी उच्चस्तर परीक्षेस नोंदणी करावी.

---

## ◈ गणित (एकूण ९ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ४१ ते ४९)

इ. ४थी ते इ. १०वीपर्यंत इयत्तांच्या शालेय अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांत पायाभूत गणितासंबंधीच्या प्रश्नापासून काही आव्हानात्मक प्रश्नापर्यंत सर्व समावेशकता असते. प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न सक्तीचे असतात. याशिवाय सामाईक प्रवेश परीक्षांची (CET) पूर्वतयारी म्हणून एक प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचा असतो. इ.९वी व १०वीसाठी सामान्य गणित भाग एक व सामान्य गणित भाग दोन यांसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतात. इ. ४थी ते १०वीसाठी एकूण १०० गुणांची परीक्षा असते. (उदा. इ.९वी बीजगणित ५० गुण, भूमिती ५० गुण) इ. ९वी व १० वी साठीच्या गणित पाचवी व सहावी या परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतल्या जातात. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तर फेब्रुवारी सत्रात परीचेत बसता येत नाही किंवा त्या परीक्षेतील गुणांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता वाटते किंवा अनुत्तीर्ण झाले असल्यास पुन्हा संधी घ्यावीशी वाटते असे विद्यार्थी सप्टेंबर सत्रात परीक्षेस बसू शकतात. **सप्टेंबर किंवा फेब्रुवारी कोणत्याही सत्रातील परीक्षेस विद्यार्थ्यांला त्या त्या परीक्षेचा संपूर्ण अभ्यासक्रम अभ्यासावा लागणार आहे.** *इंग्रजी व मराठी माध्यमाप्रमाणे शाळेच्या मागणीनुसार हिन्दी व उर्दू माध्यमातून प्रश्नपत्रिका काढण्यात येईल. अशा शाळांनी विभागाच्या दूरध्वनी क्रमांकावर स्वतंत्र संपर्क साधावा.*

---

## ◈ विज्ञान (एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ५१ ते ५६)

इ. ५वी ते इ. १०वी साठी शासनाच्या विज्ञान विषयाच्या पुस्तकावर प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र परीक्षा घेण्यात येतात. (इ. ९वी व १०वी इयत्तांसाठी भाग १ व २ अशा प्रत्येकी ५० गुणांच्या प्रश्नपत्रिका असतात.) या परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतल्या जातात.

---

## ◈ मराठी पाठांतर (एकूण ३ परीक्षा फक्त तोंडी- प्रत्येकी १०० गुण, परीक्षा कोड क्र. ७० ते ७२)

विद्यार्थ्यांची पाठांतराची तयारी चांगल्या रीतीने व्हावी म्हणून या परीक्षांची योजना तयार केलेली आहे. ही परीक्षा शाळांनी शुद्धता, पाठांतर, पठन पद्धती, अर्थ, परिणामकारकता या मुद्दयांच्या आधारे घ्यावयाची असून विद्यार्थ्यांची गुणपत्रके विद्यापीठाकडे पाठवावयाची असतात. या परीक्षेसाठी स्वतंत्र मार्गदर्शक पुस्तिका मागणीनुसार उपलब्ध होतील.

---

## ◈ इंग्रजी संभाषण (एकूण ३ परीक्षा फक्त तोंडी- प्रत्येकी १०० गुण, परीक्षा कोड क्र. ६१ ते ६३)

ही परीक्षा शाळांनी Accuracy, Resitation, Resitation Method, Content, Impact या मुद्दयांच्या आधारे घ्यावयाची असून विद्यार्थ्यांची गुणपत्रके विद्यापीठाकडे पाठवावयाची असतात. या परीक्षेसाठी स्वतंत्र मार्गदर्शक पुस्तिका मागणीनुसार उपलब्ध होतील.

---

## ◈ मराठी लेखन कौशल्य (एकूण २ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ७३ व ७४)

इ. ५वी व ६वीसाठी मराठी लेखन कौशल्य पहिली परीक्षा व इ.७वी व ८वीसाठी मराठी लेखन कौशल्य दुसरी परीक्षा घेतली जाते. या परीक्षांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**इ. ५वी व ६वी (गुण १००, वेळ ३ तास) :** निबंध (वर्णनात्मक) – १० गुण, निबंध (शब्दचित्र, व्यक्ती, प्राणी, वस्तू) – १० गुण, चित्रवर्णन– १० गुण, प्रसंगानुसार कसे वागाल– ८ गुण, अपूर्ण कथा पूर्ण करा– १० गुण, सुविचारानुसार उदाहरणे– ७ गुण, तुमच्यावर सोपविलेले काम– ८ गुण, संवाद लिहा–१० गुण, शुद्ध शब्दांची निवड– १० गुण, हिंदी व इंग्रजी भाषांतर–१० गुण, शुद्धलेखन ७ गुण.

**इ. ७वी व ८वी (गुण १००, वेळ ३ तास) :** निबंध (वर्णनात्मक)– १० गुण, आत्मवृत्त– १० गुण, अनुभव– १० गुण, संवाद– १० गुण, सुविचारांचा अर्थ लिहा– १० गुण, अपुर्ण कथा पुर्ण करा– १० गुण, प्रसंगानुसार कसे वागाल– ५ गुण, विचारांबद्दल तुमचे मत– ५ गुण, शुद्ध शब्दांची निवड– १० गुण, शुद्धलेखन– १० गुण, इंग्रजी अनुवाद करा– १० गुण.

---

## ◈ English Writing Skill (Total 2 Exams, Exam. code 75 & 76 )

इ. ५वी व ६वी साठी इंग्रजी लेखन कौशल्य पहिली परीक्षा व इ.७वी व ८वी साठी इंग्रजी लेखन कौशल्य दुसरी परीक्षा घेतली जाते. **<u>Std 5th & 6th (Total 100 marks,Time 3 hrs) :</u>** Write related words - similar words - opposite words- sentence completion - match words to meaning sentences - answer of questions general nature - look at the picture and write 10 sentences - rewrite the sentences in the proper order - tenses - punctuation - read the paragraph and complete the diagram - complete

dialogue on a given topic **Note :** Each question contains 5 marks.**<u>Std 7th & 8th (Total 100 marks,Time 3 hrs) :</u>** Vocabulary/word based exercise - complete, match, correct sentences - question answers of general nature - tenses - punctuation - proper sequence of sentences and re-write - use proper words to build given paragraph -letter writing (formal and informal) - conversation, write dialogue - drawing a diagram on the basis of the given paragraph - read table/graph and write paragraph - essay writing - report writing **Note :** Each question contains 10 marks.

---

## ◈ (Foundation For Competitive Examination)

**(एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र.१०१ ते १०६)**

स्पर्धेच्या युगात करीअर घडविण्यासाठी IIT, AIEEE, MPSC, UPSC, इ. सारख्या अनेक परीक्षांची तयारी करावी लागते. शालेय जीवनात त्याची पुरेशी माहिती व सराव नसल्याने क्षमता असूनही अडचण येते आणि विद्यार्थी मागे पडतात. अशा परीक्षांची माहिती व सराव सुरूवातीपासून होऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागावा व स्पर्धा परीक्षांचे हे आव्हान सहजतेने पेलता यावे. यासाठी तसेच असंख्य शाळा व पालकांच्या मागणीवरून विद्यापीठाने स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर Foundation For Competitive Examination <u>(FFCE)</u> या परीक्षांचे आयोजन केले आहे. फेब्रुवारी २०१४ पासून प्रत्येक इयत्तेनुसार या परीक्षा घेण्यात येतील. १०० गुणांसाठी ९० मिनिटांत १० ० प्रश्न असून सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे असतील. चालू अभ्यासक्रमाशी सुसंगत तथापि कोणत्याही एका विषयावर आधारित परीक्षेचे स्वरूप न राहता गणित, मराठी, विज्ञान, इंग्रजी, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, मानसिक क्षमता, सामान्यज्ञान इ. विषयांचा चालू घडामोडींवर परामर्ष घेण्यात येईल. तयारीसाठी स्वतंत्र संदर्भ पुस्तके परीक्षा शुल्कातच प्रत्येक विद्यार्थ्यास, परीक्षेसाठी उपलब्ध करून दिली जातील.या परीक्षा भविष्यातील स्पर्धा परीक्षांच्या सरावासाठी असल्याने विद्यार्थ्यांना कोणत्याही स्तराच्या परीक्षेस व कितीही वेळा बसता येईल. सप्टेंबर २०१४ सत्रापासून या परीक्षा लेखी परीक्षेप्रमाणेच ऑन लाईन धर्तीवर घेण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

---

## ◈ नृत्यकला (भरतनाट्यम् एकूण ४ परीक्षा, कथक एकूण ४ परीक्षा)

या परीक्षांच्या स्वतंत्र माहिती पुस्तिका अभ्यासक्रम व मार्गदर्शनपर पुस्तिका स्वतंत्र तयार करण्यात आल्या असून त्या मागणीनुसार उपलब्ध होतील

**अनेक शाळांमध्ये नृत्यकला विषय सुरु करण्याची इच्छा असते मात्र कमी मानधनात नृत्यकला विषय शिक्षक उपलब्ध होत नसल्याने इच्छा असूनही हा विषय शाळेत घेता येत नाही. शाळांची ही गैरसोय विचारात घेवून शक्य होईल अशा शाळांमधून मागणीनुसार परीक्षेस नोंदणी करणा–या विद्यार्थ्यांस नाममात्र शुल्कात नृत्यकला विषयाचे मार्गदर्शन विद्यापीठाकडून उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहिल. अशा मार्गदर्शन वर्गासाठी प्रत्येक परीक्षेसाठी किमान २५ विद्यार्थी असणे अपेक्षित आहे. याबाबत संबंधित शाळांनी विभागाशी दूरध्वनीवरुन अथवा समक्ष संपर्क साधावा.**

**भरतनाटयम् व कथक परीक्षा**

**प्रारंभिक – १०० गुण** (प्रात्य. ६०, तोंडी ३०, अं. मुल्यमापन १०) **प्रगत – १५० गुण** (प्रात्य. १००, तोंडी ४०, अं. मुल्यमापन १०)

**मध्यमा– २०० गुण** (लेखी ५०, प्रात्य. १४०, अं. मुल्यमापन १०) **पदविका– २५० गुण** (लेखी ७५, प्रात्य. १६५, अं. मुल्यमापन १०)

---

## ◈ जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षा (एकूण ४ परीक्षा)

विभागांतर्गत सत्र सप्टेंबर २०१४ पासून जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षा सुरु करीत आहे. जपान सरकारच्या प्रमाणपत्र परीक्षेची पूर्वतयारी होण्यासाठी, या भाषेची तोंडओळख व्हावी, ही भाषा लिहीता–वाचता यावी यासाठी या परीक्षांचे आयोजन करण्यात येणार आहे. परीक्षा शुल्कात, पुरविण्यात येणा–या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार या परीक्षेस प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रम अभ्यासता येणार आहे. **या भाषेचे प्रत्यक्ष मार्गदर्शन होण्यासाठी शाळांच्या मागणीनुसार माफक शुल्कात तज्ज्ञ विषय शिक्षकांची उपलब्धता करून देण्यात येईल.**

**परीक्षेचे नाव :** प्रत्येकी ५० गुण (३० गुण लेखी परीक्षा व २० गुण तोंडी परीक्षा) इंग्रजी व मराठी माध्यम

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शोदान –१ | २. | शोदान – २ |
| ३. | चूडदान – १ | ४. | चूडदान – २ |

**पात्रता :** कोणत्याही इयत्तेचा विद्यार्थी/इच्छुक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी/ पालक (वयाची अट नाही)

**परीक्षा :** दरवर्षी ऑक्टोबर व मार्च महिन्यात

**परीक्षा शुल्क :** रु. २००/– प्रत्येकी (शैक्षणिक साहित्यासह) ,**मार्गदर्शन शुल्क :** संपूर्ण वर्षाचे (दोन परीक्षांचे एकत्र) शुल्क भरल्यास रु. १०००/– व एका परीक्षेसाठी रु. ६००/– प्रत्येक परीक्षेस (किमान २५ विद्यार्थ्यांची नोंदणी असलेल्या केंद्रावर (शाळेत) मार्गदर्शन हवे असल्यास नियम व अटी लागू)

**ऑक्टोबर २०१४ सत्रातील परीक्षेस नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदत ३० जून २०१४ ही राहील.**

**मार्गदर्शन वर्ग वेळ :** शाळेच्या/केंद्राच्या सोयीनुसार शनिवार किंवा रविवार १ तास – प्रत्येक स्तराच्या अभ्यासक्रमासाठी २५ तास मार्गदर्शन देण्यात येईल.

**खाजगी क्लासेसमधील विद्यार्थ्यांस बहिस्थ म्हणूनही केवळ परीक्षा शुल्क भरुन परीक्षेस नोंदणी करता येईल.**

## ◈ हिन्दी भाषा परीक्षा (एकूण ३ परीक्षा)

हिन्दी आपली राष्ट्रभाषा, परंतु या भाषेबाबत विद्यार्थी खूपसा उदासिन असतो, अवघड वाटणा–या या भाषेतील शास्त्रशुद्ध व्याकरण, शुद्धलेखनातील तांत्रिक बारकावे, या गोष्टी सहज सोप्या करुन विद्यार्थ्यांना या भाषेतील आवड निर्माण करण्यासाठी सप्टेंबर २०१३ पासून विद्यापीठ हिन्दी भाषा परीक्षांचे आयोजन केले आहे. हिन्दी मधील तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र मार्गदर्शकपुस्तिका तयार करुन माफक शुल्कात ती विद्यार्थ्यांना देण्यात येते. तयार करण्यात आलेल्या या मार्गदर्शकपुस्तिका केवळ या परीक्षांपुरत्याच मर्यादित नसून भविष्यात सर्वांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. या पुस्तिकेमध्ये **मार्गदर्शक सूचना या मराठी भाषेतून** दिल्या आहेत त्यामुळे सर्व माध्यमाच्या शाळांना या पुस्तिकेचा लाभ घेता येईल.

**परीक्षेचे नाव :** १– हिन्दी प्रवेश परीक्षा　　२– हिन्दी प्रारंभ परीक्षा　　३– हिन्दी प्रगति परीक्षा

**पात्रता :** इयत्तेचे व वयाचे बंधन नाही. कोणत्याही परीक्षेस कोणत्याही इयत्तेचा विद्यार्थी बसू शकतो.

**गुण :** ५० (वेळ २ तास)　　**माध्यम :** हिन्दी　　**परीक्षा सत्र :** दोन सत्र (सप्टेंबर व फेब्रुवारी)

**फेब्रुवारी २०१४** मध्ये फक्त प्रवेश परीक्षा घेण्यात येतील त्यानंतरच्या सप्टेंबर २०१४ सत्रापूसन तिनही स्तराच्या परीक्षा घेतल्या जातील.

**सन्न फेब्रुवारी २०१३ मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेत बसविणा-या खालील शाळांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देवून गौरवविण्यात आले.**

| अनु क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | विद्या विकास विद्यालय, सहकारनगर, पुणे | ११७२ |
| २. | विद्याधाम प्रशाला, शिरुर, पुणे | ९९६ |
| ३. | सुरवाणी ज्ञान मंदिर, पद्मनिवास, ठाणे | ८५१ |
| ४. | राजा रघुनाथ विद्यालय, भोर, पुणे | ८०० |
| ५. | महात्मा गांधी विद्यामंदिर, नेरुळ, मंबई | ७९६ |
| ६. | एच.एच.सी.पी. गर्ल्स हायस्कूल हुजूरपागा, लक्ष्मी रोड, पुणे | ७९६ |
| ७ | शैलेंद्र एज्युकेशन माध्यमिक विद्यालय, दहिसर, मुंबई | ७५० |
| ८. | डी.ई.एस. प्रायमरी स्कूल, टिळक रोड, पुणे | ७४८ |
| ९. | एम.एस.एस. हायस्कूल, श्रीधरनगर, चिंचवड, पुणे | ६४१ |
| १०. | ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे | ६०२ |
| ११. | रावसाहेब रुपचंद विद्यालय, जिल्हा पेठ, जळगाव | ५९८ |
| १२. | राजा शिवाजी विद्यामंदिर, वसई, ठाणे | ५९६ |
| १३. | आदर्श विद्यानिकेतन, मिनचे, हातकणंगले, कोल्हापूर | ५८२ |
| १४. | सेंट क्रिस्पिन्स होम - कन्या शाळा, एरंडवणे, पुणे | ५५० |
| १५. | श्री. संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, कोथरुड, पुणे | ५४६ |
| १६. | डी.एस. हायस्कूल, सायन, मुंबई | ५४२ |
| १७. | श्रीमती हि. गो. श्रॉफ हायस्कूल, नंदूरबार | ५२८ |

**सन्न सप्टेंबर २०१३ मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेत बसविणा-या खालील शाळांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे.**

| अनु क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | राजा शिवाजी विद्यामंदिर, डोंबिवली, ठाणे | ६६४ |
| २. | एम. एस. एस. हायस्कूल, चिंचवड, पुणे | ६०० |
| ३. | विद्या विकास मंदिर माध्यमिक विद्यालय, अवसरी बु।।, मंचर, पुणे | ५७८ |
| ४. | श्री. शिवछत्रपती शिवाजी राजे माध्यमिक विद्यालय, चिंचवड, पुणे | ५५५ |
| ५. | समर्थ विद्यामंदिर, साकीनाका, मुंबई | ४७८ |
| ६. | विद्या निकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल, पिंपरी, पुणे | ४१५ |
| ७. | उषाराजे हायस्कूल, राजारामपूरी, कोल्हापूर | ४१२ |

## सत्र - फेब्रुवारी २०१३ मध्ये झालेल्या परीक्षांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थी यादी व प्रथम क्रमांकास मार्गदर्शन केल्याबद्दल प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आलेल्या शिक्षकांची यादी

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| **संस्कृतभाषाप्रवेशः (१२)** | | | |
| १ | कुलकर्णी प्रणोती | इस्लामपूर हायस्कूल, इस्लामपूर, सांगली<br>**शिक्षक– मा. प्रिया जोशी** | ९९ |
| २ | सुर्यवंशी यश | एकलव्य विद्यालय व ज्युनि. कॉलेज, नंदूरबार | ९८ |
| **संस्कृतभाषापरिचयः (१३)** | | | |
| १ | बेले किरण | सिद्धेश्वर मुलांचे हायस्कूल, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर<br>**शिक्षक – मा. आर.ए. कबाडे** | ९९ |
| २ | देशपांडे वैष्णवी | सेठ रामविलास किसनलाल लाहोटी कन्या शाळा, कराड, सातारा | ९८ |
| **संस्कृतभाषाजिज्ञासा (१४)** | | | |
| १ | कांबळे ओंकार | टिळक हायस्कूल, कराड, सातारा<br>**शिक्षक – मा. व्ही.सी. कुलकर्णी** | ९७ |
| २ | कुलकर्णी किर्ती | इस्लामपूर हायस्कूल, इस्लामपूर, सांगली | ९६ |
| **संस्कृतभाषारसास्वादः (१५)** | | | |
| १ | कुलकर्णी ऐश्वर्या | ज्युबिली इंग्रजी कन्या शाळा, मिरज, सांगली<br>**शिक्षक – मा. हर्षदा बेडेकर** | ९४ |
| २ | पाटील सचिन | साने गुरुजी नूतन माध्य. विद्यालय, अमळनेर, जळगाव | ९३ |
| **संस्कृतभाषाभिज्ञः (१६)** | | | |
| १ | इनामदार शुभम | स्मिता क्लासेस, सिंहगड रोड, विठ्ठलवाडी, पुणे<br>**शिक्षक – मा. स्मिता पारोदकर** | ९९ |
| २ | खैरनार दिपीका | श्री. एकवीरादेवी माध्य. व उच्च माध्य. शाळा, देवपूर, धुळे | ९० |
| **इंग्रजी प्री–एलिमेंटरी (२१)** | | | |
| १ | कदम विश्वजीत | मुधोजी हायस्कूल, फलटण, सातारा<br>**शिक्षक – मा. शैलेंद्र कदम** | ९२ |
| २ | लवंगारे सृष्टी | महात्मा गांधी विद्यामंदिर, डोंबिवली, ठाणे | ९१ |
| **इंग्रजी एलिमेंटरी (२२)** | | | |
| १ | अनारसे ज्ञानेश्वरी | विद्याधाम प्रशाला, घोडनदी, शिरुर, पुणे<br>**शिक्षक – मा. एम.डी.पाटील, मा. के.डी. बनकर** | ९३ |
| २ | चिले कल्पक | न्यू हायस्कूल, कोल्हापूर | ९२ |
| **इंग्रजी इंटरमिडीएट (२३)** | | | |
| १ | हरीदास मंजिरी | कवठेकर प्रशाला, पंढरपूर, सोलापूर<br>**शिक्षक – मा. बी.एन.रत्नपारखी, ज्योती विसपुत** | ८७ |
| २ | पापल वैभव | प्राईड इंग्लिश हायस्कूल, आंबेगाव बु।।, पुणे | ८६ |
| **इंग्रजी ज्युनीयर (२४)** | | | |
| १ | विधाते केतकी | एच.एस.सी.पी गर्ल्स हायस्कूल, हुजूरपागा, लक्ष्मी रोड, पुणे<br>**शिक्षक– मा. अर्चना खताळ** | ९३ |
| २ | पोतदार भाग्यश्री | जे.ई. स्कूल, मुक्ताईनगर, जळगाव | ९२ |
| **इंग्रजी सिनीयर (२५)** | | | |
| १ | जोशी श्रृती | कै.ग.रा.पुरोहीत गर्ल्स हायस्कूल, राजवाडा, सांगली<br>**शिक्षक– मा. प्राजक्ता जोशी** | ८२ |
| २ | केसरकर अश्विनकुमार | सौ. एस. एम. लोहिया हायस्कूल, कोल्हापूर | ८१ |

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| **इंग्रजी ॲडव्हांस (२६)** | | | |
| १ | सोनार धनश्री | डॉ. काने गर्ल्स हायस्कूल, परदेशीपुरा, नंदूरबार | ८६ |
| | | **शिक्षक - मा. पी.डी.पिंपळे** | |
| २ | पाटील संकेत | विवेकानंद विद्यालय, चोपडा, जळगाव | ८५ |
| **मराठी उच्चस्तर पहिली (३१)** | | | |
| १ | चंद्राद्रे मिनाक्षी | संस्कार निकेतन एक परीपूर्ण शाळा, शिवरोड, नाशिक | ८८ |
| | | **शिक्षक - शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | इंगोले नेहा | जागृती हायस्कूल, बन्सीलाल नगर, औरंगाबाद | ८२ |
| **मराठी उच्चस्तर दुसरी (३२)** | | | |
| १ | काळे रोशन | महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर, पुणे | ९१ |
| | | **शिक्षक - मा. लिला सोनावणे** | |
| २ | बस्ते प्रतिक्षा | सु. रा. मुलींचे हायस्कूल, सेवासदन, सोलापूर | ९० |
| **मराठी उच्चस्तर तिसरी (३३)** | | | |
| १ | सुतार ऐश्वर्या | सु. रा. मुलींचे हायस्कूल, सेवासदन, सोलापूर | ९३ |
| | | **शिक्षक - मा. लता पोटफोडे** | |
| २ | पाटील प्रणिता | साने गुरुजी कन्या हायस्कूल, अमळनेर, जळगाव | ९२ |
| **मराठी उच्चस्तर चौथी (३४)** | | | |
| १ | पाटील वैभवी | साने गुरुजी कन्या हायस्कूल, अमळनेर, जळगाव | ९० |
| | | **शिक्षक - मा. मुकेश पाटील** | |
| २ | रेड्डी दिप्ती | श्री. संत ज्ञानेश्वर माध्य. विद्यालय(मराठी) कोथरुड, पुणे | ८७ |
| **मराठी निम्नस्तर पहिली (३५)** | | | |
| १ | भट चिन्मय | एन.ई.एस. इंग्लिश मिडीयम स्कूल, भिवंडी, ठाणे | ९४ |
| | | **शिक्षक - शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | देशपांडे अनुजा | पी.ई.एस. मॉडर्न हायस्कूल(इंग्रजी माध्यम) शि.नगर,पुणे | ९२ |
| **मराठी निम्नस्तर दुसरी (३६)** | | | |
| १ | शुक्ला अभय | ज्योती इंग्लिश मिडीयम स्कूल, पिंपरी, पुणे | ९२ |
| | | **शिक्षक - मा. रुबेका रणभिसे** | |
| २ | ब्रम्हे सोनाली | सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर | ९१ |
| **मराठी निम्नस्तर तिसरी (३७)** | | | |
| १ | जोशी श्रेया | रोझरी हायस्कूल, वारजे, पुणे | ८६ |
| | | **शिक्षक - शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | जगताप कोमल | श्री. रामकृष्ण एज्यु. फाउंडेशनचे इं. मि. स्कूल, अहमदनगर | ८५ |
| **मराठी निम्नस्तर चौथी (३८)** | | | |
| १ | पाटील सुयोगी | तारापूर विद्यामंदिर, तारापूर, ठाणे | ८६ |
| | | **शिक्षक - मा. सरिता म्हात्रे** | |
| २ | गायकवाड मिनल | नवभारत नूतन विद्यालय, मुलुंड, मुंबई | ८५ |
| **गणित प्रवेश (४१)** | | | |
| १ | जोग सुश्रृत | नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे | ९९ |
| | | **शिक्षक - शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | कामत प्रियदर्शनी | विद्या मंदिर इंग्लिश प्रायमरी स्कूल, दहिसर, मुंबई | ९८ |
| **गणित पहिली (४२)** | | | |
| १ | विद्या ऋतुजा | विद्या विकास विद्यालय, सहकारनगर, पुणे | ९८ |
| | | **शिक्षक- मा. ज्ञानेश्वर गायकवाड, मा. सुरेखा खैरे** | |
| २ | पवार सर्वेश | श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्य. विद्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर | ९७ |

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| **गणित दुसरी (४३)** | | | |
| १ | ठाकरे नंदिनी | वनिता विद्यालय, नवापूर, नंदूरबार | ९८ |
| | | **शिक्षक - मा. संगिता वेताळ** | |
| २ | भनगे निशांत | न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग, शनिवार पेठ, पुणे | ९७ |
| **गणित तिसरी (४४)** | | | |
| १ | पाटील प्रज्योत | पाटील बाल मंदिर, मोहने, कल्याण, ठाणे | १०० |
| | | **शिक्षक - मा. फटके गजानन** | |
| २ | देसर्डा मिहीर | रोझरी हायस्कूल, कॅम्प, पुणे | ९९ |
| **गणित चौथी (४५)** | | | |
| १ | देशमुख स्नेहल | श्री. सरस्वती विद्यामंदिर, गोखीवरे, वसई, ठाणे | ९९ |
| | | **शिक्षक - मा. सुवर्णा पाटील** | |
| २ | चौधरी केतन | रावसाहेब रुपचंद विद्यालय, जिल्हा पेठ, जळगाव | ९८ |
| **गणित पाचवी (४६)** | | | |
| १ | गाडगे शुभम | महात्मा गांधी मिशन हायस्कूल, नेरुळ, नवी मुंबई | ९७ |
| | | **शिक्षक- मा. वर्षा उकरंडे** | |
| २ | भगडे प्रणिता | गौळवाडी माध्यमिक विद्यालय, गौळवाडी, रायगड | ९६ |
| **गणित सहावी (४७)** | | | |
| १ | होलगुंडे सुकन्या | विद्याधाम प्रशाला, घोडनदी, शिरुर, पुणे | ९८ |
| | | **शिक्षक- मा. एस.सी. जोशी, मा. जी.के. मुळे** | |
| २ | जडयाळ शुभम | विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे | ९६ |
| **विज्ञान पहिली (५१)** | | | |
| १ | घोटेकर कोमल | बाल विद्या मंदीर, आयोध्यानगरी, नाशिक | ८७ |
| | | **शिक्षक- मा. भारती भालेराव** | |
| २ | पवार गार्गी | सेंट जोसेफ हायस्कूल, एम.आय.डी.सी. डोंबिवली, ठाणे | ८५ |
| **विज्ञान दुसरी (५२)** | | | |
| १ | धोंगडी करन | राधाबाई शिंदे इंग्लिश मिडीयम स्कूल, सायबर चौक, कोल्हापूर | ८८ |
| | | **शिक्षक - शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | जाधव रणजीत | प्राईड इंग्लिश स्कूल, आंबेगाव बु।।, पुणे | ८५ |
| **विज्ञान तिसरी (५३)** | | | |
| १ | हरीदास कल्याणी | विद्या विकास विद्यालय | ९६ |
| | | **शिक्षक - मा. सुनिता शिंगडे** | |
| २ | कोरे अमित | प्राईड इंग्लिश स्कूल, आंबेगाव बु।।, पुणे | ९५ |
| **विज्ञान चौथी (५४)** | | | |
| १ | अहेर मयूरी | संस्कार बालक मंदिर प्राथमिक विद्यालय, जाधववाडी, औरंगाबाद | ९३ |
| | | **शिक्षक - मा. योगेश्वरी लांडगे** | |
| २ | कापुरे ममता | श्रीमती सरस्वती गुलाबराव पाटील विद्यालय, नाशिक | ८९ |
| **विज्ञान पाचवी (५५)** | | | |
| १ | शेलार अंकीता | महात्मा गांधी मिशन हायस्कूल, नेरुळ, नवी मुंबई | ९६ |
| | | **शिक्षक- शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही** | |
| २ | पदीर अभिषेक | महात्मा गांधी मिशन हायस्कूल, नेरुळ, नवी मुंबई | ९५ |
| **विज्ञान सहावी (५६)** | | | |
| १ | छलवाडी मंजूळा | भाई माधवरावजी बागल हायस्कूल, विक्रमनगर, कोल्हापूर | ९४ |
| | | **शिक्षक- मा. शिवांजली कोळेकर** | |
| २ | बीडकर जागृती | ओंकार इंग्लिश मिडीयम स्कूल, एम.आय.डी.सी. ठाणे | ८८ |

*** सप्टेंबर २०१३ च्या परीक्षांची गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी निकालासोबत देण्यात येईल.**